Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# समाजसेवा आणि महाराष्ट्रीयन महिला

**डॉ. दामोदर चं. दुधे,** सहा. प्राध्यापक, श्रीमती सविताबाई उत्तमराव देशमुख महाविद्यालय, दिग्रस, जि. यवतमाळ

**गोषवारा**

आपण एकविसाव्या शतकात वावरत असतांना मनुष्याने जीवनाच्या सर्वच क्षेत्रात गरूडझेप घेतली आहे.त्यात स्त्रीयांचे खूप मोठे योगदान आहे. जीवनाची अशी कोणतीच क्षेत्र उरले नाही जिथे भारतीय स्त्रीने पुरूषाच्या बरोबरीने प्रगतीत केली. मनुष्य आज चंदावर गेला. उच्च तंत्रज्ञान, स्पेससेक्टरमध्ये भारतीय स्त्री उंच शिखर गाठत असतांना समाजसेवा क्षेत्रात तर भारतीय स्त्री चा इतिहास साक्ष आहे. जसे, 18 व 19 व्या शतकामध्ये अनाथांची माय सिंधूताई सपकाळ, पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले, रोग्यांची सेविका मंदाताई, साधनाताई आमटे, मेघा पाटकर पर्यंत अशा अनेक समाजसेवी महिलांची महाराष्ट्राला जणू परंपराच लाभलेली आहे.

प्राचिन काळातील स्त्रीयांच स्थान, तीचे चुल आणि मुल असे कार्यक्षेत्र दिल्ली पासून तर तीच्या स्वःच्या घरात होणाऱ्या अन्याय अत्याचाराला फाटा देत प्रगतीची सर्वच क्षेत्र आज स्त्री यांच्या कामगीरीने व्यापुन गेलेली आहेत. स्वातंत्रकाळा नंतरचे तिच्या बद्दलचा समाजाचा बदलता दृष्टिकोन किंबहूना आजची घरातील तीची जबाबदारी, बदलती भूमिका याबाबत पुर्वीच्या तुलनेत कमालचा उच्चांक गाठलेला आहे. परिणाम स्वरूप हा विषय संशोधनासाठी महत्तम आहेत.

**प्रस्तावना**

आजच्या बदलत्या परिस्थितीत स्त्री ही शिक्षित होऊन, आत्मसन्मान व स्वाभिमानाने जगण्याची तिची इच्छा, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संघर्षरत आहेत ती स्त्री स्वातंत्र्य व समान अधिकार यावर बोलण्यास तयार आहे.

"पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही स्वतःचे स्वातंत्र्यशील व सृजनशील आयुष्यघडविण्याचा हक्क आहे." परंतु समाजात मानाचे स्थान मिळविण्यासाठी तिला एकत्र येऊन खूप प्रयत्न करावे लागतील. वर्तमान स्थितीत स्त्रियांची मुख्य भूमिका धर्माच्या क्षेत्रात मोठी होती. साधू-संन्याशांप्रमाणे साध्वी, संन्यासी स्त्रिया धर्माच्या क्षेत्रात आपले महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. त्या भारतीय संस्कृतीतील मूल्य, सामाजिक दोष दूर करण्याची, सत्य-अहिंसेच्या मार्गावर चालून नैतिक व चारित्रिक उत्थानाचीतसेच महात्मा गौतम बुद्ध यांनी प्रतिपादिलेल्या मध्यम मार्गाचे अनुसरण करण्याची प्रेरणा देतात. ती आध्यात्मिक, भौतिक प्रगती, मान, प्रेम, समाजसेवा, श्रद्धा, त्याग, दया, विश्वास, उदारता, मोठ्यांच्या प्रति आदरभाव व सन्मानाची भावना व मानवतावादी दृष्टिकोन शिकवते. वर्तमान स्थितीतील आवश्यकतेनुसार कृषिप्रधान भारतासाठी प्राकृतिक साधनांसारखी ; जसे - नद्यांची सुरक्षा व पर्यावरण स्वास्थ्यासाठी प्रयत्न करत आहे.

स्त्रियांनी संधी मिळाल्याबरोबर प्रत्येक क्षेत्रात आपल्या योग्यतेनुसार सहभाग घेण्यास अग्रेसर राहिल्या आहेत आणि त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात सक्रिय योगदानही दिले. शिक्षणाचा प्रचार व प्रसार करायला सुरुवात केली तसेच आर्थिक क्षेत्रात आपला सहभाग निश्चित केला. अर्थात स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात आपले स्थान निश्चित केले. १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला वर्षाचे आयोजन केले गेले. अर्थात आंतरराष्ट्रीय


Copyright © | JET Network, All Rights Reserved

स्तरावर महिलांचे महत्त्व समजावे. ८ मार्च १९९२ ला 'आंतरराष्ट्रीय महिला दिवस' जाहीर झाला. स्त्रियांच्या विकासासाठी वेगवेगळ्या समित्या वेगवेगळे कायदे संविधानाद्वारे समानता, स्वातंत्र्यतेचे अधिकार दिले गेले.

२१ वे शतक "स्त्री सबलीकरण' म्हणून घोषित करण्यात आले. वैश्विकरणाच्या भौतिकवादी युगात स्त्रिया वेगवेगळ्या क्षेत्रात उडी घेत आहेत." त्या राजनैतिक, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, प्रशासनिक, सैनिकी यासारख्या क्षेत्रांमध्ये लहानापासून तर मोठमोठ्या पदांपर्यंत गौरवपूर्ण स्थान प्राप्त करत आहेत. महिलांच्या प्रगतीतच कुटुंब, समाज, राष्ट्राची प्रगती असते. स्त्रियांना शिक्षित बनवून समाज पांगळा बनवण्यापासून वाचवता येते.

अंतरिक्षात प्रवेश करणाऱ्या कल्पना चावला व सुनीता विल्यम्स भारताच्या मूळ रहिवासी आहेत. क्रीडा क्षेत्रातसुद्धा पी.टी. उषा, सुनीता कुमारी, कर्णम मल्लेश्वरी, सानिया मिर्झा, सायना नेहवाल यांनी अप्रतिम कार्य केले.

साहित्याच्या क्षेत्रात अमृता प्रीतम, महादेवी वर्मा, झुम्पा लाहिरी, मृणाल पाण्डेय, अरुंधती रॉय व किरण देसाई यांनी तर बुकर पुरस्कार मिळवून भारताचे नाव जगात उंचावले.

समाजसेवेच्या क्षेत्रात तर भारतीय किंबहूना महाराष्ट्रीयन महिलांनी जगाला विविध पर्याय दिलेले आहे. जगातील मानतेच्या महान सेविका मदर तेरेसा (1910 - 1997), अनाथांची माय सिंधूताई सपकाळ त्यागी समाजसेवीका कै.बाबा आमटे यांच्या पत्नी साधनाताई आमटे, मेघा पाटकर, देहविक्री विरोधी कार्य करणाऱ्या प्रणिता सुभाष, स्त्री हक्कासाठी लढणाऱ्या ॲड. किरण मोघे, लोकबिरादरी प्रकल्पाद्वारे भरीव समाजसेवा करणाऱ्या मंदा आमटे, भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले ग्रामीण महिलांच्या हक्काचा आवाज रजनीताई कार्यकर्ती, महिला आर्थिक सशक्तीकरणाच्या प्रणेत्या एला भट, माहिती अधिकार RTI आंदोलन करत्या अरुणा रॉय, ॲसिड अटॅक सर्वाईवर लक्ष्मी अग्रवाल, पहिली महिला IPS पोलीस सुधारक सामाजिक कार्यकर्ती किरण बेदी अशा विविध महिलांनी समाजसेवे सारख्या क्षेत्रामध्ये केलेल्या भरीव कार्याची दखल घेणे हे एक महान कार्यच असुन त्या दृष्टीने संशोधकाने सदर विषयाची निवड करणे महत्वाचे वाटले.

**उद्देश**

1. समाजसेवा कार्यामध्ये महिलांची भूमिका तपासणे.
2. समाजाच्या जडणघडणीत महिलांचे योगदान अभ्यासणे.
3. समाज विकासात सेवाभावी महिलांच्या कार्याचा आढावा घेणे.
4. समाजसेवी महिलांची गरज समस्या व त्यावर उपाय योजणा सुचविणे.
5. समाजसेवी महिलांचा समाज कार्यातील सहभाग तपासणे.

**गृहितके**

1. समाजाच्या जडणघडणीत महिलांचे योगदान आहे.
2. सेवाभावी महिलांचा समाज कार्यातील सहभाग अतिशय कमी आहे.
3. समाजसेवा कार्यात कार्य करणाऱ्या महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.
4. या सेवाभावी महिलांना कोणत्याही प्रकारची विशेष प्रकारच्या सेवा सोयी सुविधांचा शासन दरबारी अभाव आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**विषयाचे महत्व**

रविंद्रनाथ टागोर म्हणतात "Women is the builder and moulder of a Nation's destiny" यावरुन महिलांचे राष्ट्रीय महत्व अधोरेखित होते. प्राचीन काळापासून गार्गी, मैत्रेयी सारख्या महिलांनी समाजसेवेतील आपली चुणूक दाखवून दिली. स्वातंत्र्यपूर्व काळात सावित्रीबाई फुले, सिंधुताई सपकाळ, साधना आमटे, मेघा पाटकर, मंदा आमटे, ॲड. किरण मोघे, रजनीताई, एला भट्ट, अरुणा रॉय, किरण बेदी, इ. महिलांना समाजसेवेतील आपला वेगळाच ठसा उमटविला.

महिलांचा समाजसेवेतील सहभाग हा वरील महिलांच्या उदाहरणावरुन अतिशय प्रभावी वाटत असला तरी हे वरवर दिसणारे चित्र मात्र प्रत्यक्ष वेगळे आहे. एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ निम्मे असणाऱ्या महिलांमध्ये अशा बोटावर मोजता येणाऱ्या महिला समाजसेवेत सक्रिय दिसतात. मात्र लोकसंख्येच्या तुलनेत महिलांचे समाजसेवेत प्रमाण अल्प आढळते. समाजात महिलांना चार भिंतीआड असणाऱ्या कामांमध्येच व्यस्त करुन त्यांना बंदिस्त करुन ठेवलेले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजातल्या या ५०% मतदार असलेल्या महिलांना समाजसेवेत सक्रिय करण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात आला आहे. मानवतेच्या महान पुजारी मदर तेरेसा, अनाथांची माय सिंधुताई सपकाळ, रोग्यांची कैवारी मंदा आमटे अशा अनेक महिलांनी स्त्रियांमध्ये समाजसेवेत व सामाजिक जागृती निर्माण करण्यासाठी केलेले दिसतात.

अशा या सेवाभावी महिलांच्या कार्याचा समाजातील या क्षेत्रामध्ये येऊ इच्छिणाऱ्या भावी महिलांना प्रेरणा मिळाली आणि त्यांचा सहभाग वाढून समाज सुजलाम सुफलाम व्हावे या दृष्टिने सदर विषय संशोधनासाठी महत्वाचा आहे.

**संशोधन पद्धती**

महिलांचे समाजसेवेतील स्थान, सहभागीत्व, त्याचे प्रमाण अभ्यासत असतांना स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांच्या समाजसेवाकार्यातील सहभागाविषयी नोंदी, त्यांच्या विषयी इतरांनी नोंदविलेल्या नोंदी व मते इ. ची माहिती ऐतिहासिक साधनांद्वारे प्राप्त केली असून त्यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब केला आहे. त्याचप्रमाणे महिलांचा समाजसेवेतील सहभागाचा परामर्श घेण्यासाठी तुलनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर केलेला असुन ज्यात न्युजपेपर, मासिके संदर्भ ग्रंथ, सोशल मिडिया ई. वापर केलेला आहे.

**विषय विवेचन**

"समाजसेवा सहभाग हे लोकशाही व्यवस्थेत पाठिंबा देण्याचे किंवा काढून घेण्याचे त्याचप्रमाणे शसकांना शासितांप्रती जबाबदार करण्याचे मुख्य साधन असते." "समाजसेवाकार्यात सहभाग म्हणजे एक व्यक्ति किंवा नागरीक या नात्याने समाजसेवा व्यवस्थेत कमी-अधिक प्रमाणात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभागी होणे." समाजसेवा कार्यातील महिलांचा सहभाग हा समाज प्रगतीच्याबाबतीत सक्रिय स्वरुपाचा असून यात प्रथमतः व्यक्ती समाजसेवा विविध सेवाभावी संघटना संस्था यांच्याद्वारे हे समाजकार्याचे निस्वार्थीपण अविरत कार्य करुण समाज प्रगतीपथावर नेण्याचे महान कार्य या महिलांनी केलेले आहे. त्यातील काही प्रमुख महिलांची नावे पुढील प्रकारे सांगता येईल.

**समाजसेवा कार्यात भरीव कामगीरी करणाऱ्या महिला**

मराठी महिलांची नावे आहेत ज्या समाजकार्याच्या क्षेत्रात मोठे योगदान देत आहेत:


Copyright © | JET Network, All Rights Reserved

1. सिंधुताई सपकाळ ( 1948-2021) - "अनाथांची माय" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधुताईंनी अनाथ मुलांसाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले.
2. मेघा पाटकर - नर्मदा बचाव आंदोलनाच्या माध्यमातून विस्थापितांच्या हक्कांसाठी लढा दिला.
3. प्रणिता सुभाष - मानवी तस्करीविरोधी कार्यासाठी प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या.
4. अॅड. किरण मोघे - स्त्रियांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या समाजसेविका आणि वकिल.
5. डॉ. प्रकाश आमटे आणि मंदा आमटे - लोकबिरादरी प्रकल्पाच्या माध्यमातून गडचिरोलीतील आदिवासींसाठी कार्यरत.
6. सावित्रीबाई फुले (1831-1897) - भारतातील पहिल्या महिला शिक्षिका आणि समाजसुधारक.
7. रजनी ताई कार्यकर्ती - ग्रामीण भागातील महिलांच्या हक्कांसाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्या.

**समाजसेवा कार्यात भरीव कामगीरी करणाऱ्या इतर भाषीक महिला**

1. एला भट्ट (1933 - 2022 ) - SEWA (सेल्फ-एम्प्लॉयड वुमेन्स एसोसिएशन) की संस्थापक, जिन्होंने महिलाओं के आर्थिक सशक्तिकरण के लिए काम किया।
2. अरुणा रॉय - सूचना के अधिकार (RTI) आंदोलन की प्रमुख कार्यकर्ता।
3. लक्ष्मी अग्रवाल - एसिड अटैक सर्वाइवर, जो एसिड अटैक पीड़िताओं के अधिकारों के लिए काम कर रही हैं।
4. सावित्रीबाई फुले (1831-1897)- भारत की पहली महिला शिक्षिका और समाज सुधारक, जिन्होंने लड़कियों की शिक्षा के लिए काम किया।
5. मदर टेरेसा (1910-1997 ) - गरीबों और जरूरतमंदों की सेवा में अपना पूरा जीवन समर्पित किया, उन्हें नोबेल शांति पुरस्कार भी मिला।
6. किरण बेदी - भारत की पहली महिला IPS अधिकारी, जो पुलिस सुधार और सामाजिक न्याय के लिए कार्यरत रहीं।

या महिलांच्या कार्यांचा संशोधनासाठी किंबहुना समाज प्रगतीसाठी मोठे योगदान आहे.

**महिलांचा सक्रिय समाजसेवेतील सहभाग**

भारतातील समाजसेवा कार्यामध्ये महिलांच्या सहभागाची अचूक माहिती उपलब्ध नसुन श्रमशक्तीत महिलांचे योगदानाबाबत मात्र उपलब्ध् आहे. ज्यात, 2017 ते 2018 मध्ये 23.3 प्रतीशत तर 2020 ते 2021 मध्ये ते वाढून 32.5 झाला.

भारतातील महिलांचा विविध समाजसेवा क्षेत्रातील सहभागांचा खालील प्रकारे मांडता येईल.

**तक्ता क्रमांक 1**

| अ. क्र. | क्षेत्रे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| 1 | स्वयंमसेवी संस्था / संघटना द्वारे समाज कार्य (NGO) | 50 ते 60% |
| 2 | आरोग्य सेवा व परिचारीका द्वारे समाज कार्य | 70 ते 80 % |
| 3 | शिक्षा व न्याय द्वारे समाज कार्य | 40 ते 50% |
| 4 | ग्रामीण विकास व स्वयंमअर्थसहाय्य आणि बचतगट द्वारे समाज कार्य | 60 ते 70% |

वरील तक्त्याचे विश्लेषण केल्यास असे दिसते की स्वयंमसेवी संस्था / संघटना द्वारे समाज कार्य (NGO) शेकडा प्रमाण 50 ते 60%, तर आरोग्य सेवा व परिचारीका द्वारे समाज कार्य शेकडा प्रमाण 70 ते 80 %, शिक्षा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

व न्याय द्वारे समाज कार्य शेकडा प्रमाण 40 ते 50% आणि ग्रामीण विकास व स्वयंमअर्थसहाय्य आणि बचतगट द्वारे समाज कार्य शेकडा प्रमाण 60 ते 70% अशा प्रकारे समाज कार्यामध्ये महिलांचा ढोबळ मानाने सहभाग दिसुन येतो. यावरुन समाजकार्यामध्ये महिला पारंपारीक चौकटीतुन बाहेर पडून सामाजिक क्षेत्रामध्ये सहभाग नोंदवितांना दिसत असल्यातरी त्यांचा हा केवळ संख्यात्मक सहभाग असुन गुणात्मक दृष्ट्या आजही त्या कुटुंबाच्या, समाजाच्या चौकटीत राहुनच कार्यात सहभागी होत असल्या कारणाने निश्चितच समाजसेवेच्या कार्यामध्ये आजही त्यांचेप्रमाण अतिशय कमी आहे. त्यांच्या या कार्याला मर्यादा आहे. परिणाम स्वरूप महिलांचे या सेवेत सहभाग वाढविणे काळाची गरज आहे.

**महिलांचा समाजसेवा कार्यात सहभाग वाढविण्यासाठी सुचना**

1. महिलांमध्ये समाजकार्याबाबत जाणीवा व जागृती वाढविणे गरजेचे आहे.
2. महिलांनी स्वेच्छेने समाजकारणात सहभागी होऊन आत्मविश्वासपुर्वक वावरणे आवश्यक.
3. जुन्या परंपरा प्रवृत्तीला मुठमाती देवून समाजाने महिलांच्या सहभागाविषयी प्रयत्नपुर्वक संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष व शिफारसी**

1. सेवाभावी महिलांना समाजकार्यात लोकसंख्येच्या तुलनेत सहभागाचे प्रमाण अतिशय कमी आहे.
2. स्वयंसेवी महिलांचे समाजात दुय्यम स्थान आहे.
3. समाजसेवी महिलांचे समाजकार्यामध्ये सहभाग वाढविण्याच्या दृष्टिकोणातुन महिला विधेयक महत्वाचे पाऊल आहे.
4. सेवाभावी महिलांना शासन स्तरावरुन विविध सेवा सुविधांचा अभाव आहे.
5. समाजकार्यामध्ये येवु इच्छिणाऱ्या महिलांना अधिकाधिक सहभागी होण्यासाठी शासन दरबारी अधिक प्रयत्नांची गरज आहे.

**सारांश**

महाराष्ट्रातील सामाजिक सेवा क्षेत्रात कार्य करणाऱ्या ग्रामिण भागातील व शहरातील महिलांच्या समस्या जवळपास सारख्याच आहेत. स्त्री जीवनातील समस्यांना तोंड फोडणाज्या समस्यांना प्रतिबंध करणारा, उत्तरे देणारा मार्ग आजच्या समाजात अत्यंत महत्वाचा ठरतो. स्त्रियांच्या परिस्थितीकडे पाहण्याची तसेच समाजातील निष्प्रभ्र झालेल्या वर्गाच्या परिस्थितीकडे पाहण्याची दृष्टी. स्त्रियांच्या समान हक्कांचा पुरस्कार करणारी विचारधारा निर्माण करणे. तसेच समाजातील अत्यंत दुर्बल घटकांतील स्त्री वर्गाला स्त्रियांचा समान हक्कांचा पुरस्कार करणारी विचारसरणी निर्माण होणे आवश्यक आहे.

तसेच स्त्रियांचा समाजातील भुमिका, समाजातील दर्जा, समाजातील स्त्रीचे योगदान, स्त्रियांची स्थिती, स्त्रियांच्या समस्या, स्त्री विषयक दृष्टीकोन ह्या विषयावर सर्व काळात उहापोह देखील झाला पाहिजे. जीवनाची अशी कोणतीच क्षेत्र उरले नाही जिथे भारतीय स्त्रीने पुरूषाच्या बरोबरीने प्रगतीत केली. मनुष्य आज चंदावर गेला. उच्च तंत्रज्ञान, स्पेससेक्टरमध्ये भारतीय स्त्री उंच शिखर गाठत असतांना समाजसेवा क्षेत्रात तर भारतीय स्त्री चा इतिहास साक्ष आहे. जसे, 18 व 19 व्या शतकामध्ये अनाथांची माय सिंधूताई सपकाळ, पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले, रोग्यांची सेविका मंदाताई, साधनाताई आमटे, मेघा पाटकर पर्यंत अशा अनेक समाजसेवी महिलांची महाराष्ट्राला जणू परंपराच लाभलेली आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

चुल आणि मुल असे कार्यक्षेत्र दिल्ली पासून तर तीच्या स्वःच्या घरात होणाऱ्या अन्याय अत्याचाराला फाटा देत प्रगतीची सर्वच क्षेत्र आज स्त्री यांच्या कामगीरीने व्यापुन गेलेली आहेत. स्वातंत्रकाळा नंतरचे तिच्या बद्दलचा समाजाचा बदलता दृष्टिकोन किंबहूना आजची घरातील तीची जबाबदारी, बदलती भूमिका याबाबत पुर्वीच्या तुलनेत कमालचा उच्चांक गाठलेला आहे. परिणाम स्वरूप हा विषय संशोधनासाठी महत्तम आहेत.

**संदर्भ**


1. आघाडीचे महिला नेतृत्व - अरुवादक : सुमिता बोरस, मुळ लेखिका: सुधा मेनन फेब्रुवारी - 2014 / ISBN No. 97881-8498-538-2
2. खरेखुरे आयडॉल - संपादक : सुहास कुळकर्णी, समकालीन प्रकाशन : 15 ऑग. 2019
3. 101 श्रेष्ठ महिला सौ. माधवी कवी, विद्याभारती प्रकाशन : लातुर.
4. महिला सबलीकरण : डॉ.संभाजी देसाई, 2 मार्च 2014 ISBN No.978-93-82-528-86-9



Copyright © | JET Network, All Rights Reserved